# Government of Maharashtra resolution (GR)

शैक्षणिक वर्ष २००८-२००९ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय :- क्र.टिईएम-२००८/( १९३ /०८)/तांशि-१,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - १७ जून, २००८ .

संदर्भ.- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद , नवी दिल्ली यांचे दिनांक ५ मे, २००८ चे क्र.
१)०६/०७/MHA/PHARM/०५५
२) ०८/०९/MS/Pharm/२००८/०२
३) ०७/०८/MS/Pharm/२००८/०५

शासन निर्णय:- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००८-२००९ करिता खाली नमूद संस्थांना नविन औषधनिर्माणशास्त्र ( पदवी अभ्यासक्रम ) महाविद्यालय ६० प्रवेशक्षमतेत सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी, माळेवाडी, सांगोला रोड, अकलुज, जि. सोलापूर-४३१ १०१ | बी फार्मसी | ६० |
| २ | प्रबोधन शिक्षण प्रसारक संस्थेचे इंदिरा इंस्टिटयूट ऑफ फार्मसी मु. पो. साडवली ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी | बी फार्मसी | ६० |
| ३ | आदर्श शिक्षण मंडळाचे आयडियल कॉलेज ऑफ फार्मसी ॲण्ड रिसर्च , स. नं. २१/एच, न. ११ आदर्श विद्या नगरी अंबरनाथ ठाणे | बी फार्मसी | ६० |

PH119
119123

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थांना खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००८-२००९ नविन औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम महाविद्यालय ६० प्रवेशक्षमतेत सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधन कारक राहील.

**TRUE COPY**

Principal
Indira Institute of Pharmacy,
Sadavali (Devrukh)

शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापिठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापिठांची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार पध्दतानुसार करण्यात येतील.

६) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य मुंबई व संबंधित विद्यापिठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

७) संस्थेने त्याच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत.
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबइ
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
कुलसचिव, मुंबई विद्यपिठ मुंबई
संबंधित संस्था (संचालकां मार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव ( तांत्रिक ), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००२
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

C:\AICTE Approvals\shramsadhana jalgaon.doc

TRUE COPY

Principal
Indira Institute of Pharmacy,
Sadavali (Devrukh)